**<u>सं.फौ.ख.क्रं.१७२/२०२३</u>**

शासन वि. सोपान

**<u>नि.क्रं.१२</u>**

सरकारतर्फे साक्षीदार क्रं.१ ची साक्ष शपथेवर सुरु

नाव – सविता अंकुश शिंदे

वय – ४२ वर्षे,

व्यवसाय – शेती,

राहणार – कापरेवाडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर.

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एन. आर. वाघ यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–</u>**

न्यायालयात उपस्थित असलेला आरोपी आमच्या गावातला आहे. तो गुराकडे असतो. त्याच्याकडे हाल्या, गाया व म्हशी अशी गुरे आहेत. माझ्याकडे देखील २ म्हशी आहेत.

२. दि. १३/०२/२०२३ रोजी मी ०३.०० वाजताच्या दरम्यान मी गुरांना पाणी पाजण्यासाठी हंडळवाडीच्या जंगलात गेले होते. आरोपींनी त्यांचा मारका हाल्या माझ्या अंगावर सोडला व त्यांनी तो हाल्या ओढला नाही. त्या हाल्याने मला भरपुर मारले, त्यामुळे माझ्या नाका तोंडातून रक्त आले. हाल्याने मला खाली पाडु–पाडु मारले. आरोपीने हाल्या ओढला नाही. निमगावचे सरपंच राजु यांनी तो हाल्या ओढला व बांधला व मला गाडीत टाकून कर्जत येथील केशर हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यानंतर मी आरोपीवर गुन्हा दाखल केला. आता मला फिर्यादी जबाब दाखवला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझा निशाणी अंगठा आहे. त्यास **<u>नि.क्र.१३</u>** देण्यात येते. आता मला प्रथम खबर अहवाल दाखवला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझा निशाणी अंगठा आहे. त्यास **<u>नि.क्र.१४</u>** देण्यात येते. आरोपी न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. यु. एस. नेवसे–</u>**

३. हे खरे आहे की, माझे पती अंकुश याची मी दुसरी पत्नी आहे. माझ्या सवतीचे नाव गोदाबाई होते. हे मला माहित नाही की, माझ्या पतीने माझ्या सवतीला जिवे मारल्यामुळे ते तुरुंगात गेले होते. हे खरे आहे की, माझे पती तुरुंगातून सुटल्यावर त्यांनी माझ्याशी लग्न कले. हे खरे आहे की, माझे पती यांनी आत्महत्या करुन ते मयत झाले आहेत. माझ्या पतीला पहिल्या

पत्नीपासून दोन मुले आहेत. मी फिर्याद देताना मारका हाल्या व अंगावर सोडला असे मी सांगितले नाही. माझ्याकडे २ म्हशी ७ ते ८ वर्षांपासुन आहेत.

**प्रश्नः** म्हैस किंवा जनावरे माजावर आल्यावर इकडे–तिकडे पळताता, उड्या मारतात?

**उत्तरः** साक्षीदार सदर प्रश्नाचे उत्तर देत नाही.

हंडळवाडी– कापरेवाडी रस्त्याने चरायला गेलेल्या म्हशी येतात. ज्ञानदेव रोकडे व रामदास शिंदे यांच्या म्हशीमध्ये हाल्या आहे. हे खरे आहे की, कर्जत–कापरेवाडी–हंडाळवाडी रस्त्या माझ्या घरापासून जातो. आरोपीचा हाल्या आमच्याघरी येत असायचा. तो हाल्या सोपान शिंदे यांच्या मालकीचा नसुन तो मंडलिक यांच्या मालकीचा आहे. हे खरे नाही की, घटनेच्या दिवशी तो हाल्या मोकळा होता. मी घटनेनंतर १६ तारखेला फिर्याद दिली. शकुंतला शिंदे हे माझे घर सोडून २–३ घरानंतर राहतात. रस्त्याच्या कडेला दुसऱ्या लोकांची बरेच घरे आहेत. माझ्या घराच्या मागील बाजुस दक्षिणेला सोपान शिंदेचे मालक संभाजी मंडलिक यांची जमिन आहे. माझ्या घरापासून गावात जाण्यासाठी या जमिनीतून रस्ता आहे. सदरचा रस्ता मिळावा म्हणुन मी व माझ्यासह इतर लोकांनी तहसिलदार यांचेकडे प्रकरण दाखल केले. हे खरे आहे की, तो रस्ता संभाजी मंडलिक यांनी बंद केला आहे. हे मला माहिती नाही की, रस्त्याबाबत दिवाणी कोर्टात दावा होता व तो संभाजी मंडलिक यांच्या बाजुने निकाल लागला. संभाजी मंडलिक व आमचे कोणतेही संबंध नाहीत. संभाजी मंडलिकचा पुतण्या सुभाष मंडलिक यांच्यावर माझी जाऊ शकुंतला हिने कलम ३५४ चा गुन्हा दाखल केला आहे. सदर केसमध्ये साक्षीदार म्हणुन माझे नाव आहे. हे खरे नाही की, त्यामुळे संभाजी मंडलिक व त्याचा गडी यांच्यावर मी खोटी केस केली आहे. कापरेवाडीपासून कर्जत ४ कि.मी. अंतरावर आहे. कापरेवाडीपासून कर्जतला मोटरसायकलवर येण्यासाठी १५ ते २० मिनिटे लागतात. तीन दिवस उशीराने फिर्याद देण्याचे कारण की मी ३ दिवस दवाखान्यात उपचार घेत होते. हे खरे नाही की, मला काही लागले नव्हते व मी दवाखान्यात गेले नाही. फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी मला दवाखान्याचे पत्र दिलेले नाही. हे खरे नाही की, मला काही लागले नसल्यामुळे पोलीसांनी मला पत्र दिले नाही. हे खरे आहे की, घटनास्थळापाशी नाला आहे. घटनास्थळाजवळ असलेल्या पुलाची निश्चीत उंची मला सांगता येत नाही. जनावरांना त्या पुलाजवळील पाणी पिण्यासाठी कडेने जाऊन पाणी पिता येते. हे खरे नाही की, त्या उतारापाशी माझ्याच म्हशीने मला मारले व त्यामुळे मी जखमी झाले, आरोपीच्या हाल्याने मला मारले नाही. हे खरे नाही की, संभाजी मंडलिक यांना अडचणीत आणण्यासाठी व रस्त्याच्या केसमुळे त्याचा गडी आरोपी याच्यावर मी खोटी केस केली आहे. फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी मला घटनास्थळी बोलवले व मी गेले. त्याठिकाणी

पोलीसा, मी व माझा मुलगा हजर होतो. ती तारिख मला सांगता येणार नाही. ती वेळ दुपारी ०२:०० ते ०३:०० च्या दरम्यानची होती. हे खरे नाही की, आरोपीला मी त्रास देण्यासाठी खोटी केस करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.12.19 17:44:24 +0530

दिनांकः १९/१२/२०२५

(आर. बी. राऊत)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.

न्यायालय क्र. ०२